पिंपरी चिंचवड
# अंतरंग

तपपूर्ती विशेषांक

■ वर्ष: 10 ■ अंक: 2 ■ 22 जुलै 2020 ■ पिंपरी-चिंचवड, पुणे ■ पाने: १६





# तपपूर्ती एमपीसी न्यूजची!

भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून 12 वर्षांच्या कालगणनेला विशेष महत्त्व आहे. 12 वर्षे म्हणजे एक तप. पूर्वी ऋषीमुनी कठोर ध्यानधारणा, साधना करीत, त्याचा कालावधी सर्वसाधारणपणे 12 वर्षांचा असे. त्याला तपश्चर्या म्हणत. अनेक समस्या, अडी-अडचणी, संकटे यांना तोंड देण्याची ती एक सत्त्वपरीक्षाच असे. उपलब्ध किमान साधने आणि प्रबळ इच्छाशक्ती यांची सांगड म्हणजे तपश्चर्या. ही तपश्चर्या पूर्ण केल्यानंतर टिकून राहण्याचे आणि वाढण्याचे सामर्थ्य तपश्चर्या करणाऱ्या व्यक्तीला प्राप्त होते, असे म्हणतात. 12 वर्षांची सत्त्वपरीक्षा दिल्याने तावून-सुलाखून निघालेल्याला सोन्यासारखी झळाळी प्राप्त होते. काळाच्या कसोटीवर पारखून घेतलेल्या या शंभरी नंबरी सोन्याला आपोआप समाजमान्यताही प्राप्त होते.

'स्मार्ट सिटी' पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील स्मार्ट मीडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'एमपीसी न्यूज' या शहरातील पहिल्या मराठी न्यूज पोर्टलने 12 वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करून तेराव्या वर्षात पदार्पण केले आहे. दोन सर्वसामान्य पत्रकारांनी लावलेले हे रोपटे आता चांगलेच फोफावले आहे.

**विशेष संपादकीय | विवेक इनामदार**


'स्मार्ट सिटी' पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील स्मार्ट मीडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'एमपीसी न्यूज' या शहरातील पहिल्या मराठी न्यूज पोर्टलने 12 वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करून तेराव्या वर्षात पदार्पण केले आहे. दोन सर्वसामान्य पत्रकारांनी लावलेले हे रोपटे आता चांगलेच फोफावले आहे.


(पान 2 वर)

(पान 1 वरून)

# तपपूर्ती एमपीसी न्यूजची, तपपूर्ती मल्टिमीडिया पत्रकारितेची!

मराठी वेबसाईटचा इतिहास साधारणतः सप्टेंबर 1996 पासून सुरु झाल्याचे दिसून येते. पहिले मराठी न्यूज पोर्टल 1998 मध्ये सुरु झाल्याची नोंद आढळून येते. फॉन्ट डाऊनलोड करावा लागणाऱ्या वेबसाईट, डायनॅमिक एनकोडिंगमधील वेबसाईट आणि युनिकोडमधील वेबसाईट अशी स्थित्यंतरे मराठी वेबसाईट्सच्या इतिहासात दिसून येतात.

बरोबर 12 वर्षांपूर्वी म्हणजे 22 जुलै 2008 ला आम्ही 'माय पिंपरी चिंचवड डॉट कॉम' या नावाने शहरातील पहिले सिटी न्यूज पोर्टल सुरु केले. त्यावेळी 'ऑनलाईन मीडिया' या शहरवासीयांसाठी पूर्णपणे नवीन होता. शहरात ऑनलाईन मीडिया रुजवण्यापासूनचे आव्हान तेव्हा आमच्यापुढे होते.

निर्भिड, निष्पक्षपाती आणि विश्वासार्ह पत्रकारिता करीत एमपीसी न्यूजच्या टीमने हे आव्हान केवळ स्वीकारलेच नाही तर समर्थपणे पेलले आहे. एमपीसी न्यूजचे अनुकरण करीत त्यानंतर शहरात सुमारे दोन डझन न्यूज पोर्टल सुरु झाली आहेत, हे 'एमपीसी न्यूज'च्या यशाचे प्रमाण आहे, हे आम्ही नम्रतापूर्वक सर्वांच्या निदर्शनास आणू देऊ इच्छतो.

**198 देश, 6,620 शहरे आणि 88 लाखांहून अधिक युनिक व्हिजिटर्स**

पुणे, पिंपरी-चिंचवड, मावळ परिसरातील स्थानिक घडामोडींचा वेध घेणारे हे न्यूज पोर्टल इंटरनेटच्या जाळ्यातून जगभर पसरेल, याची पुसटशीही कल्पनाही आम्हाला 12 वर्षांपूर्वी नव्हती. शहर व जिल्ह्यातील लोकांना हव्या असणाऱ्या लोकल ब्रेकिंग न्यूज आम्ही देत गेलो. आणि या परिसराशी संबंधित मात्र जगभर विखुरलेले नेटीझन्स एमपीसी न्यूजला जोडले जाऊ लागले.

जगभरातील 198 देशांतील 6,620 शहरांमधील तब्बल 88 लाख 2 हजार 820 वाचकांपर्यंत (युनिक व्हिजिटर्स) पोहचण्याचे आणि त्यांच्या पसंतीस उतरण्याचे तसेच विश्वासास पात्र ठरण्याचे भाग्य एमपीसी न्यूजला मिळाले आहे. शहर व परिसराची बित्तंबातमी देणारी अग्रगण्य वृत्तसेवा म्हणून एमपीसी न्यूजचा नावलौकिक झाला आहे. सुरुवातीला महिन्याला काही हजार हिट्स मिळायच्या आता महिन्याला काही कोटी हिट्स मिळतात, याचे सर्व श्रेय आम्ही आमच्या दर्शकांना देतो.

आधुनिकता आणि नावीन्याचा ध्यास घेऊन 2008 पासून शहरवासीयांची सेवा करणाऱ्या टीम एमपीसी न्यूजने मोबाईल क्रांतीनंतरची गरज लक्षात घेऊन एसएमएस न्यूज अलर्ट्स सेवा सुरु केली. सोशल मीडियाचा प्रभावी वापर करीत फेसबुक पेज, व्हॉट्स ॲप बुलेटीन, ट्वीटर, यूट्यूबच्या माध्यमातून शहरातील ताज्या घडामोडींबाबत जगाला अपडेट ठेवण्याची कामगिरी केली. यावर्षी टेलिग्राम आणि इन्स्टाग्राम या प्लॅटफॉर्मवरही आपले स्थान निर्माण केले आहे.

बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन स्थानिक बातम्या देणारे एमपीसी न्यूज हे शहरातील पहिले
मोबाईल ॲप्लिकेशन सुरु करण्याचा मानही आम्हाला मिळाला. आम्ही गेली दोन वर्षे सकाळी ताज्या बातम्या देणारे ऑडिओ बुलेटीन प्रसारित करीत असल्यामुळे बातम्यांचे श्रवण करण्याचा आनंदही आमच्या श्रोत्यांना उपलब्ध झाला आहे.

**पॉडकास्ट आणि व्हिडिओ बुलेटीन**

वाचकांच्या मागणीनुसार आम्ही आता दररोज सकाळी एमपीसी न्यूज पॉडकास्ट आणि रात्री दिवसभरातील ठळक घडामोडींचा धावता आढावा घेणारे व्हिडिओ बुलेटीन देखील तपपूर्तीच्या निमित्ताने सुरु केले आहे. मल्टीमीडियाचा वापर करून आम्ही दर्शकांना मोठ्या विश्वासाने ग्वाही देऊ इच्छितो, राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!




नागरिकांच्या सुख-दुःखात साथ देणारा हक्काचा सोबती, पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराचा आरसा, कोणत्याही पुढाऱ्याचा अथवा राजकीय पक्षाचा नव्हे तर सर्वसामान्य जनतेचा आवाज असणारे 'एमपीसी न्यूज डॉट इन' हे न्यूज पोर्टल आता पुणे व पिंपरी-चिंचवडकरांचा जणू ऑनलाईन 'जीवनसाथी' बनले आहे, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. हाडाच्या पत्रकारांनी सर्वसामान्यांसाठी सिटी न्यूज पोर्टल चालविण्याच्या या प्रयोगाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. एमपीसी न्यूज हे मंथन राष्ट्रीय पारितोषिक विजेते शहरातील एकमेव सिटी न्यूज पोर्टल आहे, ही बाबही अभिमानास्पद आहे.

गेल्या 12 वर्षांच्या काळात आम्ही पाच वेळा एमपीसी न्यूजला नवीन चेहरा दिला. अधिक आकर्षक मांडणी असलेले यूजर फ्रेंडली न्यूज पोर्टल विकसित करण्यासाठी आमचे सातत्याने नवनवीन प्रयोग सुरु असतात. स्थानिक बातम्यांबरोबर राज्यातील व देश-विदेशातील ठळक घडामोडींचा आढावा देण्यास तसेच मनोरंजन, लाईफस्टाईल, क्रीडा, तंत्रज्ञान अशा जीवनाच्या विविध अंगांशी संबंधित लेख आणि माहिती देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे एमपीसी न्यूजच्या वाचकप्रियतेत अधिकच भर पडली आहे.

स्मार्ट सिटीमधील या स्मार्ट मीडिया हाऊसच्या यशामध्ये आपण सर्व वाचक, दर्शक, हितचिंतक, जाहिरातदार, तांत्रिक सल्लागार, पत्रकार सहकारी व अन्य टीम मेंबर असे आपण सर्वजण बरोबरीचे भागीदार आहात. आपल्या भक्कम पाठबळाशिवाय ही आव्हानात्मक वाटचाल केवळ अशक्य होती. त्यामुळे तपपूर्ती साजरी करीत असताना आपणा सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे, हे आमचे कर्तव्य आहे. आमच्यावरील आपला विश्वास आणि प्रेम असेच पुढे राहू देत.

(पान 6 वर)

mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

Siddhivinayak CONSTRUCTION
Promoters & Builders

वर्धापनदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!!

शुभेच्छुक

Siddhivinayak
NEST
1 & 2 BHK FLATS

Project by: **Ganesh Kakade**


mpc
news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
एमपीसी न्यूजला
वर्धापनदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
श्रीरंग आप्पा बारणे
खासदार
मावळ लोकसभा मतदारसंघ
शिवसेना


राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री
मा.ना.
अजितदादा
पवार
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक : सुनिल शंकरराव शेळके
आमदार - मावळ

# तपपूर्ती एमपीसी न्यूजची, तपपूर्ती मल्टिमीडिया पत्रकारितेची!

(पान 2 वरून)

**कोरोना संकट काळातील आपला विश्वासू सहकारी**

सध्याचा काळ हा सर्वांसाठीच आव्हानात्मक आहे. कोरोना महामारीच्या संकटात विश्वासार्ह ऑनलाईन मीडियाची गरज अधोरेखित झाली. या संकटकाळात 'टीम एमपीसी न्यूज'च्या सर्व सदस्यांनी आपला जीव धोक्यात घालून समाजाला खात्रीशीर माहिती पुरविण्याचे तसेच जनजागृतीचे काम पूर्ण क्षमतेने केले. सर्वसामान्य आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून 'एमपीसी न्यूज'ने जबाबदारी पार पाडली. अनेक अडीअडचणीतील लोकांपर्यंत मदत पोहचविण्यात 'टीम एमपीसी न्यूज'चा मोठा हातभार लागला, याचे आम्हाला मनोमन समाधान आहे.

कोरोना संकट आणि त्यानंतरच्या लॉकडाऊनमुळे देशातील बहुतेक सर्वच मीडिया हाऊसचे अर्थकारण ढासळले आहे. कोरोनाने अनेक पत्रकारांच्या नोकरीचा पण बळी घेतला आहे. अनेक माध्यम संस्थांनी त्यांच्या पत्रकारांचे वेतन निम्म्यापर्यंत कमी केले आहे. या पार्श्वभूमीवर 'एमपीसी न्यूज'ने मात्र कोणत्याही परिस्थितीत टीम मेंबरचे वेतन कमी न करण्याचा निर्णय घेतला. लॉकडाऊनमुळे एमपीसी न्यूजच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे अशा परीक्षेच्या काळात आम्हालाही आपल्या पाठबळाची नीतांत गरज आहे. नेहमीप्रमाणे या संकट काळातही समाज आमच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील, याबाबत आमच्या मनात तीळमात्र शंका नाही.

**आय सपोर्ट 'एमपीसी न्यूज' #I_Support_MPCNews**

आपली सेवा यापुढेही अशीच चालू राहण्यासाठी तसेच अधिक सक्षमपणे सेवा देण्यासाठी 'एमपीसी न्यूज'च्या टीमचा विस्तार करण्याची योजना आहे. त्यासाठी आम्हाला आपल्या पाठिंब्याची गरज आहे. अर्थातच त्यासाठी कोणत्याही प्रकारची सक्ती असणार नाही. आपण दिवसाला एक रुपया याप्रमाणे एक वर्षासाठी किमान 365 रुपये इतकी ऐच्छिक वर्गणी एमपीसी न्यूजच्या बँक खात्यात ऑनलाईन जमा करावी, असे आवाहन आम्ही या निमित्ताने करीत आहोत.

आम्ही गेल्या 12 वर्षांत प्रामाणिकपणे केलेल्या सेवेची दखल घेऊन तसेच यापुढे अधिक चांगली सेवा मिळावी यासाठी ***#I_Support_MPCNews*** या मोहिमेत सहभागी व्हाल, असा विश्वास वाटतो.

वर्षाला 365 रुपये शक्य नसेल तर एक रुपयापासून कितीही ऐच्छिक रक्कम आपण आमच्या कामासाठी मदत म्हणून पाठवू शकता. आपला एक रुपया देखील आमच्यासाठी मोलाचा आहे. तो सत्कारणीच लागेल, याची खात्री आम्ही आपणास देतो. वर्षाला 365 रुपयांपेक्षा अधिक सपोर्ट करण्याची इच्छा असणारे वाचक व हितचिंतक त्यांच्या इच्छेप्रमाणे अधिकची मदत देखील करु शकतात. आपणही मदतीचा हात पुढे करावा आणि आपल्या मित्रांनाही त्याबाबत सांगावे, असे आवाहन आम्ही या निमित्ताने करीत आहोत.

***#I_Support_MPCNews*** या मोहिमेअंतर्गत मदत करु इच्छिणाऱ्यांसाठी आपल्या न्यूज पोर्टलवरच ऑनलाईन पेमेंट जमा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. UPI, नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड अशा कोणत्याही माध्यमातून आपण आम्हाला सपोर्ट करु शकता. आपण आतापर्यंत केलात त्यापेक्षा अधिक सपोर्ट आता आणि भविष्य काळात कराल आणि प्रामाणिक, सकारात्मक पत्रकारितेला सामाजिक व आर्थिक पाठबळ देखील द्याल, असा मनोमन विश्वास वाटतो. धन्यवाद!







mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
एमपीसी न्यूजला वर्धापनदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
विठ्ठल उर्फ नाना काटे
विरोधी पक्ष नेते
पिंपरी-चिंचवड महानगर पालिका


mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
एमपीसी न्यूजला
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
एकनाथदादा पवार
मा. सभागृह नेते
नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगर पालिका

# अचूक निर्णय घेणारे धडाकेबाज नेतृत्त्व- अजितदादा

आक्रमक, धाडसी, दूरदर्शी आणि विकासाभिमुख नेतृत्व याचे दुसरे नाव म्हणजे अजितदादा पवार. सत्ता असो किंवा नसो, त्याच तडफेने आणि उत्साहाने जनतेची प्रश्ने सोडवण्याची धमक उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यात आहे. दादांनी वेळोवेळी आपल्या नेतृत्त्वगुणाची आणि अचूक निर्णय क्षमतेची चुणूक राज्याचा गाडा चालवताना दाखवली आहे. समस्या कोणतीही असो तिचे रामबाण उत्तर अजितदादांकडे असणारच.

आज पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा जो विकास झाला आहे, त्याचे शिल्पकार अजितदादा हेच आहेत, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. पण जेव्हा-केव्हा या दोन शहरांच्या विकासाची चर्चा होते. तेव्हा सर्वांत प्रथम प्रत्येकांच्या तोंडी नाव येते ते अजितदादांचे. पिंपरी-चिंचवडच्या पायाभूत विकासाची मुहूर्तमेढ दादांनी रोवल्यामुळेच आज राज्यात सर्वाधिक विकसित आणि पुढारलेल्या शहरांमध्ये या शहराच्या नावाचा समावेश होतो.

**अभीष्टचिंतन | दिग्विजय जिरगे**

सध्या कोरोना विषाणूने संपूर्ण जगाला वेढले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडला या कोरोनारुपी राक्षसाने आपल्या बाहुपाशात कवटाळले आहे. या प्रतिकूल परिस्थितीतही अजितदादा अत्यंत संयमाने अचूक निर्णय घेताना दिसत आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवेतील 4 अधिकाऱ्यांची शहरात नेमणूक केली आहे. प्रत्येकाला जबाबदारी वाटून दिली आहे. स्वतः वारंवार बैठका घेऊन कोरोनावर कसे नियंत्रण मिळवता येईल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत.

औद्योगिक नगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील यंत्रे लॉकडाऊन काळात बंद पडली होती. याचा परिणाम या उद्योगधंद्यावर अवलंबून असलेल्यांवर झाला. अनेकांच्या हातातील कामे चालली होती. त्यावेळी येथील उद्योगधंदे सुरु होण्याची आवश्यकता होती. अजितदादांनी त्वरीत याची दखल घेत पिंपरी-चिंचवडला रेड झोनमधून काढून उद्योगधंदे सुरु करण्याची मुभा दिली. येथील यंत्रे पुन्हा सुरु झाली. अजितदादांच्या या निर्णयामुळे उद्योगांसमोर आलेले मोठे संकट टळले.

कोणताही विलंब न लावता पटापट निर्णय घेऊन समोरील समस्या लवकरात लवकर सोडवण्यावर त्यांचा भर असतो. याचा प्रत्यय काही दिवसांपूर्वी दिसून आला. गेल्या काही दिवसांपासून सारथी संस्थेवरुन वाद सुरु होता. यासाठी अनेक आंदोलने झाली. पण ज्यावेळी अजितदादांनी हा प्रश्न आपल्या हाती घेतला. तेव्हा त्यांनी एका बैठकीतच यावर तोडगा काढत सारथी संस्थेसाठी 8 कोटींच्या निधीची घोषणा केली.

(पान 9 वर)



# अचूक निर्णय घेणारे धडाकेबाज नेतृत्त्व - अजितदादा


(पान 8 वरून)


अजितदादा इतर नेत्यांप्रमाणे केवळ घोषणेवरच थांबले नाहीत. त्यांनी घोषणेच्या दोन तासांत हा निधी सारथी संस्थेला उपलब्ध करुन दिला. तसा निरोप त्यांनी सारथी संस्थेला कळवलाही. यावरुन पुन्हा एकदा त्यांच्या त्वरीत निर्णय घेण्याच्या कार्यशैलीचे कौतुक झाले. प्रशासनावर प्रचंड पकड आणि ताकदीचा नेता अशी ओळख असलेला हा नेता प्रत्येकाला हवाहवासा असा आहे.










mpc
news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
तपपूर्ती
एमपीसी न्यूज
आपल्या न्यूज नेटवर्कने यशाची
गगन भरारी घ्यावी..
ह्याच आपल्या
वर्धापनदिनी
शुभेच्छा
मा.श्री.तुषार रघुनाथ हिंगे
उपमहापौर-पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# जनतेच्या मनात घर केलेला नेता- देवेंद्र फडणवीस

पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद असो किंवा मुख्यमंत्रीपद नाहीतर सध्याचं विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद... अभ्यासूपणा आणि आक्रमकता हा स्थायीभाव. ज्या तडफेने राज्यशकट चालवले तेवढ्याच तळमळीने जनतेच्या प्रश्नांसाठी विरोधी पक्षनेते म्हणून विधीमंडळात आपली छाप पाडणारे देवेंद्र फडणवीस कार्यकर्त्यांबरोबरच जनतेलाही आपले वाटतात. नागपूर महापालिकेतून प्रवास सुरु केला. तो राज्याच्या प्रमुखपदापर्यंत आला आणि आता केंद्रातील वाटा त्यांना खुणावताना दिसत आहेत. आव्हान कोणतेही असो ते लीलया पेलणे ही त्यांची खासियत.

सत्तेवर असताना त्यांच्या या नेतृत्वगुणाची झलक देशाला पाहायला मिळाली. सर्वाधिक आंदोलने आणि मोर्चांना सामोरे गेलेले मुख्यमंत्री म्हणून कदाचित देवेंद्र फडणवीस यांचेच नाव घेता येईल. इतकी आंदोलन यशस्वीपणे हाताळण्याचा विक्रमही त्यांच्याच नावावर असेल.

**अभीष्टचिंतन | दिग्विजय जिरगे**

स्वच्छ प्रतिमा, अभ्यासू वृत्ती, कुशल युवा राजकारणी आणि आर्थिक धोरणांसह विविध विषयांचा व्यासंग असलेले देवेंद्र फडणवीस. नगरसेवक, सर्वात कमी वयात महापौर, आमदार, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पद ते मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते पद असा त्यांचा आतापर्यंतचा राजकीय प्रवास ठरला आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या सुरु असलेल्या मेट्रोच्या कामाला गती फडणवीस यांच्या कार्यकाळातच मिळाली. वर्षानुवर्षे रखडलेला हा प्रकल्प फडणवीस यांनी मार्गी लावला. या प्रकल्पाला पैशांची कमतरता भासू दिली नाही. त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळेच लवकरच पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मेट्रो धावताना दिसेल. यामुळे रस्त्यावर पडणारा भारही कमी होईल.



कितीही मोठे संकट असो किंवा आणीबाणीची स्थिती, त्यांच्या चेहऱ्यावर कधी तणाव दिसत नाही. उलट प्रत्येक आवाहनाला ते स्मित हास्याने सामोरे गेल्याचे दिसतात. किंबहुना हेच त्यांचे सामर्थ्य आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

(पान 9 वर)



# जनतेच्या मनात घर केलेला नेता - देवेंद्र फडणवीस

(पान 8 वरून)

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली युती सरकारची कामगिरी दमदार राहिली होती. जनतेच्या मनात त्यांनी घर केले होते. त्यामुळे यावेळीही पुन्हा युतीचे सरकार सत्तेवर येणार आणि पुन्हा देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होणार असे जनतेला वाटले होते.

परंतु, निवडणुकीनंतरच्या राजकीय घडामोडींमुळे भाजप-शिवसेना युती सरकार सत्तेवर आले नाही. पण यामुळे निराश न होता देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद स्वीकारले आणि महाविकास आघाडी सरकारला पहिल्याच अधिवेशनात धारेवर धरले. विधानसभेच्या पहिल्याच सत्रात पहिल्याच मिनिटापासून विरोधी पक्षनेते म्हणून फडणवीस आक्रमक दिसले. अनेकवेळा त्यांनी सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. माहिती, कायद्याची सखोल जाण, वक्तृत्व यामुळे ते सभागृहात इतरांपेक्षा वरचढ ठरतात.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली युती सरकारची कामगिरी दमदार राहिली होती. जनतेच्या मनात त्यांनी घर केले होते. त्यामुळे यावेळीही पुन्हा युतीचे सरकार सत्तेवर येणार आणि पुन्हा देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होणार असे जनतेला वाटले होते.

गावोगावी जाऊन तेथील कोरोनाच्या स्थितीचा, तेथील सोयीसुविधांचा आढावा घेणे, अधिकाऱ्यांना गैरसोयीबद्दल जाब विचारणे आणि कोरोना रोखण्यासाठी राज्य सरकारने काय करायला हवे याच्या मार्गदर्शक सूचना देताना ते दिसत आहेत.

या परिस्थितीत बाहेर फिरणे धोक्याचे असतानाही त्यांनी याची काळजी केली नाही. उलट त्यांनी त्यांचे सहकारी आणि माजी मंत्री गिरीश महाजन यांना फोन करुन आपल्याला कोरोना झाला तर खासगी रुग्णालयात दाखल न करात मुंबईतील सरकारी रुग्णालयात दाखल करण्याची विनंती केल्याचे वृत्त समोर आले. यातून त्यांच्या भावनाही स्पष्ट होतात.



www.namratagloria.com



2BHK FLATS @
50
LACS
AVAIL SPECIAL PRICE OFFER

Namrata GLORIA

NEARING POSSESSION WITH MODERN AMENITIES

MAHA-RERA REGN.NO.: P52100003691
Available @ www.maharera.mahaonline.gov.in

Namrata Construction | Omkar Group | BHONDVE BROTHERS | Call: 90110 49230 / 90110 49260 | sales@namratagloria.com | CREDAI


निर्भीड आणि रोखठोक
mpc
news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : श्री सुनिल शंकरराव शेळके
आमदार - मावळ


mpc
news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
१२ वा वर्धापनदिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
श्री.निखिल उल्हास भगत
(नगरसेवक तळेगाव दाभाडे नगरपरिषद )

# जबरदस्त उत्साह, न थकणारा नेता...

इतर राजकीय मंडळी सकाळी आराम करीत असताना सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करण्याची पवार कुटुंबीयांची परंपरा अजितदादांनी जपली. स्वयंशिस्त पाळणारा, स्वत:वर काही चांगली बंधने लादून घेणारा नेता, दिलेली वेळ व शब्द पाळून वेळेचे महत्त्व जाणणारा कार्यक्षम कर्तव्यदक्ष राजकारणी, सर्वसामान्य वंचित, उपेक्षित व्यक्तींना केंद्रबिंदू मानूनशेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणारा हक्काचा माणूस.

प्रत्येक कामाची मुळापासून व खोलवर माहिती घेऊन प्रश्न मार्गी लावणारा व निर्णय घेण्याची क्षमता असलेला. उपमुख्यमंत्री म्हणून प्रशासकीय जाण असल्याने प्रशासनावर पकड. मनाने स्वच्छ व निर्मळ. जे ओठात तेच पोटात असणारा एकमेव नेता.

सर्वसामान्यांचे प्रश्न व समस्या सोडविणारा, कार्यकर्त्यांना ताकद देऊन त्यांचा सन्मान करणारा नेता. आपल्या परिवारातील व्यक्ती म्हणून हक्काने रागवून नंतर पाठीवर मायेने हात फिरविणार पक्षाचा प्रमुख. टापटीप व्यवस्थितपणा व शिस्तप्रिय एकमेव नेता अजितदादा.दादांसारखे आपली कर्तव्ये योग्यप्रकारे चोखपणे बजाविणारे, रोखठोक बोलणारे मंत्री राज्यात सापडणार नाही. अजितदादा आपल्या धाडसी निर्णयामुळे संपूर्ण राज्यामध्ये लोकप्रिय आहेत. त्यांचे अनेक निर्णय सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी व शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेले असतात.

जलसंपदा मंत्री असताना विरोधकांनी अनेक बिनबुडाचे आरोप केले. त्यांची बदनामी केली. कोट्यवधी रुपये खर्च करून फक्त १ टक्का क्षेत्र ओलिताखाली वाढेल, असे दिशाभूल करणारे आरोप केले. परंतु भाजप सरकारने सचिव पातळीवर नेमलेल्या समितीने नुकताच त्यांचा अहबाल शासनाला सादर करून प्रसिद्व केला. त्यामध्ये लाखो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली वाढले असल्याचे नमूद केले आहे.


अजितदादा कार्यक्षम नेते असल्याने त्यांच्यावर विरोधक खोटे आरोप करून कटकारस्थान रचतात. परंतु त्यांच्या अशा खोट्या आरोपांमुळे राज्याचे मोठे नुकसान होते, हे विरोधकांनी लक्षात घेतले पाहिजे. ते कोणतेही काम जीव ओतून करतात, तसेच ते ध्येयवादी आहेत. वेळप्रसंगी त्यांची चूक झाली तर कबूल करण्याचे धाडस दाखवितात.
आज देशात पुणे शहर व पिंपरी-चिंचवड शहर अव्वल नंबरवर आहेत. आज या शहरात येणारी प्रत्येक व्यक्ती अजितदादांच्या दूरदृष्टीचे व कार्यक्षमतेचे कौतुक करते व अजितदादा म्हणजे नक्की विकास हा विश्वास बाळगते. त्यांच्यासोबत असणाऱ्या व्यक्तीही शिस्तप्रिय, कार्यक्षम, कर्तव्यदक्ष होतात. अशा आदर्श नेत्याला वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून पाहण्याचे भाग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुभाष जगताप**
मा. अध्यक्ष, स्थायी समिती पुणे म.न.पा. | मा. सभागृह नेता पुणे म.न.पा.
मा. नगरसेवक, पुणे म.न.पा.

mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!
वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !

कैलास बारणे
गटनेते, अपक्ष आघाडी
पिंपरी-चिंचवड महानगर पालिका



SOCIAL RESPONSIBILITY
TEAM AS AN ASSET
HONESTY & TRANSPERANCY
TECHNOLOGY
TIME & QUALITY
PANELS
• Providers of services and products in the field of electrical engineering
• Design and manufacturer of HT/LT electrical and instrumentation control panels
SOLAR
• Diversification into Solar Power
• Focus areas: IT, Manufacturing, Automobiles, Process, Food & Pharma, Industrial & Commercial Projects
ORBITTAL
ORBITAL REPRESENTS AN ENERGY LEVEL, THAT EXISTS WITHIN ATOM INTO WHICH ELECTRON IS EXCITED HENCE "ORBITTAL REPRESENTS ENERGY & SYNERGY !"
EMS & LIGHT
• Power electronic solutions & latest technologies
• Efficient handling of complete product life cycle
LED
• Developed a host of LED and Solar powered lighting solutions & Retrofit solutions
PROJECTS
• Professionally managed electrical engineering firm
• Specialized in medium and large scale project execution pan India
DECATHLON
www.orbittal.com | info@orbittal.com | +91-9763717956